

१७ ऑक्टोंबर हा प्रसिद्ध अभिनेत्री स्मिता पाटील यांचा जन्मदिन. गेल्या पंधरा वर्षाच्या कारकिर्दीत एकावर एक सरस व्यक्तिरेखा साकारणाऱ्या स्मिताची नेहमीच आठवण येईल.

अस्मितेच्या भूमिका साकारणारी स्मिता

वृत्तवेध

आवाज जनसामान्यांचा...



विजयादशमी दसऱ्याच्या शुभेच्छा!

जय जननी, जय जन्मदायिनी।
विश्व वन्दिनी लोक पालिनी, देवि पार्वती, शक्ति शालिनी, परम पूजिता, महापुनीता, जय दुर्गा, जगदंबा माता।
जन्म मृत्यु भवसागर तरिणी,सर्वरक्षिका, अन्नपूर्णा, महामानिनी, ज्योतिरूपिणी, पथप्रदर्शिनी।
सिंहवाहिनी, शस्त्रधारिणी, पापभंजिनी, मुक्तिकारिणी, महिषासुरमर्दिनी, विजयिनी।

बुधवार, १७ ऑक्टोबर २०१८, खंड १६, अंक : सातवा | संपादकीय : व्यक्तीस्वातंत्र्याचा जागर | पाने: २

संक्षिप्त

लातूरला स्वतंत्र विद्यापीठ करावे

लातूर: लातूरला स्वतंत्र विद्यापीठ मंजूर करण्यात यावे, या मागणीसाठी 'आम्ही लातूरकर विद्यापीठ निर्माण कृती समिती'च्या वतीने राज्यपाल सी. विद्यासागर राव यांना निवेदन देण्यात आले. २००७ मध्ये नांदेड विद्यापीठाचे लातूर येथे उपकेंद्र सुरु करण्यात आले होते. सध्या या उपकेंद्रात विधी शाखा अभ्यास ३, पदव्यूत्तर अभ्यासक्रम १५, संकुल ४, संचालक, प्राद्यापक २१, विभाग ५, अन्य शिक्षकेत्तर कर्मचारी आणि प्रशासकीय इमारत उपलब्ध आहे.

'वाडा कोलम' वाचवण्याची हाक

वाडा (पालघर), ता. १७ : वाडा येथील प्रसिद्ध कोलम तांदळाच्या नावाखाली आंध्र प्रदेश, तामिळनाडू आणि कर्नाटक या राज्यात तयार होणारा त्यासारखाच दिसणारा बोगस तांदूळ सर्वत्र विकला जात आहे. त्यामुळे अस्सल 'वाडा कोलम'ला योग्य भाव मिळत नसल्याने, मूळ पालघरमधील वाडा गावात पिकणाऱ्या 'वाडा कोलम'चे अस्तित्व टिकवण्यासाठी तिचे भौगोलिक मानांकन (जि. आय.) करणे गरजेचे आहे.

सोमालियातील ६० दहशतवादी ठार

न्यूयॉर्क, ता. १७ (वृत्तसंस्था) : अमेरिकेच्या हवाई हल्ल्यात सोमालियातील ६० दहशतवादी ठार झाल्याची माहिती अमेरिकेच्या लष्कराने दिली आहे. हे दहशतवादी 'अल-शबाब' या संघटनेशी संबंधित होते. नोव्हेंबर २०१७ मध्ये झालेल्या हल्ल्यानंतर सर्वात मोठा हल्ला असल्याचे समजले जाते.

राजस्थानमध्ये झिकाचे ८० रुग्ण

जयपूर, ता. १७ (वृत्तसंस्था) : राजस्थानमध्ये 'झिका विषाणू'चा प्रादुर्भाव वाढला आहे. आतापर्यंत राजस्थानमध्ये ८० रुग्ण आढळून आलेले आहेत. या पार्श्वभूमीवर केंद्रीय आरोग्यमंत्री जे.पी.नड्डा यांनी तातडीची बैठक घेऊन आढावा घेतला. राज्य तसेच केंद्रीय आरोग्य विभाग एकत्र येऊन या समस्येशी लढतील, तसेच केंद्र सरकारकडून सर्व प्रकारची मदत पुरवण्याची ग्वाही मंत्र्यांनी दिली आहे.

जायकवाडीचा पाणीप्रश्न पेटणार

अहमदनगर, ता. १७ : नगर-नाशिक जिल्ह्यातील धरणांमध्ये उपलब्ध असणारे पाणी आणि जायकवाडीतील पाणी याचा अभ्यास केल्यानंतर साधारणत: सहा टीएमसी पाण्याची तूट असल्याचे सोमवारच्या बैठकीत स्पष्ट झाले. त्यामुळे पाण्यासाठी नगर-नाशिक विरुद्ध मराठवाडा पाणी प्रश्न पेटनार अशी चिन्ह आहेत.

ॲनी बोन्स यांना बुकर पुरस्कार जाहीर

लंडन, ता. १७ : जागतिक प्रतिष्ठेचा मॅन बुकर पुरस्कार ॲनी बोन्स यांच्या मिल्कमॅन या कादंबरीस जाहीर झालामिल्क मॅन ही कादंबरी उत्तर आयर्लंड मधील कॅथॉलिक आणि प्रोटेस्टंट यांच्या संघर्षावर आधारित आहे५६ वर्षीय ॲनी बोन्सयांनी २००१ मध्ये नो बॉन्स ही पहिली कादंबरी लिहिलीमॅन बुकर हा पुरस्कार २००५ पासून अनुवादित इंग्रजी पुस्तकांसाठी दिला जातो २०१६ पासून प्रत्येक वर्षी हा पुरस्कार दिला जातो मूळ ब्रिटनमध्ये प्रकाशित झालेल्या कादंबरी किंवा कथासंग्रह हा पुरस्कार दिला जातो.

कौमार्यचाचणीला विरोध करणाऱ्या ऐश्वर्यावर बहिष्कार

कंजारभाट समाजातील अनिष्ठ प्रथा, पिडीतेची पोलिसात तक्रार

पिंपरी, ता. १७ : समाजातील अनिष्ठ रुढीला न जुमानता कौमार्य चाचणीला विरोध करुन समाजात एक नवीन आदर्श निर्माण केलेल्या ऐश्वर्या भट-तमाईचकर यांना समाजाकडून बहिष्काराला सामौरे जावे लागले आहे. नवरात्रीनिमित्त माहेरी गेलेल्या ऐश्वर्या यांना कौमार्य चाचणीला विरोध करुन समाजाची बदनामी केल्याचे म्हणत खेळण्यापासून रोखण्यात आले. तसेच ऐश्वर्या यांच्या आईला त्यांना येथून घेऊन जाण्यास सांगण्यात आले. ऐश्वर्या यांच्या ही गोष्ट लक्षात येताच त्यांनी तेथून जाण्यास नकार दिला. त्यामुळे आयोजकांनी दांडियाचा कार्यक्रम रद्द केल्याचे जाहीर केले. तसेच केवळ मुलांना डिजेवर नाचण्याची परवानगी

दिली. पण ऐश्वर्या तमाईचकर यांनी गप्प न बसता या अन्यायाविरूध्द लढा देण्याचे ठरवून त्यांनी पोलीस स्थानकामध्ये तक्रार दाखल केली. कौमार्य चाचणीला विरोध केल्यामुळे त्यांच्या कंजारभाट समाजातून मोठ्या रोषाला सामोरे जावे लागत आहे.

विवेक आणि ऐश्वर्या यांनी अनिष्ठ रुढीविरोधात लढा दिल्याने त्यांच्या समाजाकडून त्यांना बहिष्कृत करण्यात आले आहे. मे महिण्यात त्यांचा विवाह झाला होता. सोमवारी ऐश्वर्या या त्यांच्या माहेरी पिंपरी येथे गेल्या होत्या. भाटनगर येथे देवीची आरती झाल्यानंतर दांडियाचा कार्यक्रम सुरु झाला. काहीवेळाने ऐश्वर्या यांनी दांडिया खेळण्यास सुरुवात केली. कार्यक्रमाच्या आयोजकांच्या लक्षात ही गोष्ट आल्यानंतर दांडियाचा कार्यक्रम थांबविण्यात आला. ऐश्वर्या यांना बहिष्कृत करण्यात आल्याने त्यांनी पोलीस स्थानकामध्ये तक्रार दाखल करण्यास गेल्यानंतर पुन्हा दांडियाचा कार्यक्रम सुरु करण्यात आला.

दडपशाहीच्या बाता

खरंच महाराष्ट्राला पुढारलेपण मिरवण्याचा अधिकार आहे का आणि आरोपींकडून आमक्याकडून तमक्याकडून पोलिस तक्रारच रद्द करुन घेऊ, अशा उघड उघड दडपशाहीच्या बाता मारल्या जाणार असतील. तर पोलिस तक्रार दाखल होऊन पुढील कारवाईची अपेक्षा कोणाकडून करावी. सगळं चीड आणणारं आहे.

- विवेक तमाईचकर याच्या फेसबुक वॉलवरून साभार

“ मला तेथे दांडीया खेळण्यास मज्जाव करण्यास आला. यावेळेस माझ्यासोबत जे लोक दांडीया खेळत होते तेदेखील तेथून निघून गेले. अचानक आज दांडीया होणार नाही, अशी घोषणा करण्यात आली. यावेळी माझ्या आईनेदेखील तेथून निघून आणण्यासाठी दबाव आणला. मात्र मी तेथेच उभी राहिले. शेवटी मी समाजाचा नियम मोडल्याने माझ्यासोबत ही वागणूक होत असल्याचे मला सांगण्यात आले. शेवटी मी तेथून निघून गेल्यावर कार्यक्रम पुन्हा सुरू करण्यात आला. हा प्रकार धक्कादायक असल्याने मी याविरोधात ठाम भूमिका घेण्याचा निर्णय घेतला आहे.

- ऐश्वर्या भट-तमाईचकर

शबरीमला मंदिराचे दरवाजे आज उघडणार

महिलांना रस्त्यातच रोखल्याने तणावाचे वातावरण

तिरुवनंतपूरम, ता. १७ (वृत्तसंस्था) : केरळमध्ये मासिक पूजेसाठी भगवान अय्यप्पाचे शबरीमला मंदिर बुधवारी उघडण्यात येणार आहे. या मंदिराचे प्रवेशद्वार मानले जाणाऱ्या निलाकलमध्ये महिलांना रस्त्यातच रोखल्याने तणाव निर्माण झाला आहे.

आम्हाला सर्वोच्च न्यायालयाचा निकाल मान्य नाही. आमच्या धार्मिक भावनांमध्ये हस्तक्षेप करण्याचा कोणालाही अधिकार नाही. आम्ही १० ते ५० वयोगटातील महिलांना मंदिरात प्रवेश करू देणार नाही, असे सांगत आंदोलकांनी मंदिराकडे जाणारी अनेक वाहने अडवली. त्यातून महिलांना उतरण्यास सांगण्यात आले. त्यानंतर येथे तणाव वाढला. कायदा हातात घेण्याचा कोणालाही अधिकार नाही. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाचे पालन करण्यात येईल असे मुख्यमंत्री पी. विजयन यांनी स्पष्ट केले आहे.

शबरीमला मंदिरात सर्व वयाच्या महिलांना प्रवेश देण्यात यावा असा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. या निर्णयाला विरोध होत आहे. त्यामुळे रहाटी येथे काही भक्तांनी वाहने थांबवून मंदिराकडे जाणाऱ्या महिलांना उतरण्यास सांगितले. त्यांनी राज्य परिवहनची वाहनेही थांबवली. कोणत्याही परिस्थितीत महिलांना मदिरात जाऊ देणार नसल्याची भूमिका त्यांनी घेतली आहे. पोलिसांची कमी कुमक असल्याने आंदोलकांना आवरणे पोलिसांना कठीण जात आहे. सर्वांनी कायद्याचे पालन करून सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचे सन्मान करावा असे आवाहन मुख्यमंत्री पी. विजयन यांनी केले आहे. तरीही तणाव कमी झालेला नाही. आम्ही न्यायालयाच्या निर्णयाचे पालन करणार असून महिलांना मंदिरापर्यंत जाण्यास सुविधा पुरवण्यात येतील असे त्यांनी सांगितले.

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाविरोधात एका महिलेने मंगळवारी आत्महत्येचा प्रयत्न केला होता. राज्यात काही ठिकाणी न्यायालयाच्या निर्णयाचे स्वागत करण्यात आले. तर काही ठिकाणी विरोध होत आहे. त्यातच बुधवारी मासिक पूजेसाठी मंदिर खुले होणार असल्याने तणाव वाढला आहे. राज्य सरकार सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचे पालन करण्याच्या भूमिकेवर ठाम आहे. तर भाजपने न्यायालयाच्या निर्णयाचा विरोध करत सचिवालयापर्यंत मोर्चा काढला. शबरीमला मंदिराची पारंपरिक रुढी आणि श्रद्धा जपण्यात याव्या अशी मागणी भाजपने केली आहे. त्यासाठी जनआंदोलन उभारणार असल्याचे सांगण्यात आले.

निर्णायाची अंमलबजावनी करणार : विजयन

सर्वोच्च न्यायालयाने मागच्या महिन्यात दिलेल्या सबरीमाला मंदिरा मध्ये सर्व वयोगटाच्या महिलांना प्रवेश देण्याच्या निर्णयाचा केरळ सरकार पुर्णपणे आदर करते. तसेच या निर्णया विरुदध पुनर्विचार याचिका दाखल न करण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे मुख्यमंत्री पी. विजयन यांनी स्पष्ट केले आहे. तसेच सर्व वयोगटातील महिलांना सुरक्षित दर्शन घेता यावे यासाठी खास महिला पोलिस तैनात कले असल्याचे त्यांनी सांगितले.

सर्वोच्च न्यायालयाच्या विरोधात केरळ मध्ये जोरदार आंदोलने चालु आहेत. त्यामुळे परिस्थिती तणावपूर्वक आहे.

मूलभूत हक्कासाठी छात्रभारतीचा लाँग मार्च

कार्तिक पुजारी

पुणे, ता. १७ : महाराष्ट्रातील बहुजन समाजातील विद्यार्थ्यांचे शिक्षण व रोजगाराचे हक्क मिळवण्यासाठी राष्ट्र सेवा दल आणि छात्रभारती यांच्या वतीने दिनांक १५ ते २१ नोव्हेंबर २०१८ या कालावधीत फुले वाडा, पुणे ते मंत्रालय, मुंबई असा लाँग मार्च आयोजित करण्यात आला असल्याची माहिती छात्रभारतीचे अध्यक्ष दत्ता ढगे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

संविधानाने दिलेला शिक्षण व रोजगारचा हक्क जर सरकार आपल्याला पुरवू शकत नसेल तर त्या सरकारला जाब विचारण्याची वेळ आलेली आहे आणि त्यासाठीच आम्ही हा लाँग मार्च काढत आहोत असे छात्रभारतीचे महासचिव विनय सावंत, यांनी सांगितले.

केजी टू पीजीपर्यंत सर्व मुला-मुर्लीना मोफत शिक्षण मिळावे, शिक्षणावर १०% खर्च व्हावा, महापरीक्षा पोर्टल बंद करून सर्व परीक्षा एमपीएससीमार्फत घेण्यात यावी, २०११ च्या जनगणनेनुसार लोकसंख्येच्या प्रमाणात पदनिर्मिती करण्यात यावी, शिक्षणातील विनाअनुदानित धोरण कायमचे रद्द करावे, मराठी शाळा व रात्र शाळा बंद करण्याचा निर्णय त्वरित मागे घेण्यात यावा या विविध मागण्यांसाठी छात्रभारती व राष्ट्र सेवा दल रस्त्यावर उतरणार आहे.

मायक्रोसॉफ्टचे सहसंस्थापक पॉल ॲलन यांचे निधन

न्यूयॉर्क : मायक्रोसॉफ्टचे सहसंस्थापक पॉल ॲलन (वय ६५) यांचे सोमवारी (ता.१५) निधन झाले आहे. ॲलन यांना २००९ पासून कर्करोगाने ग्रासले होते. त्यांनी आपले बालपणीचे मित्र व सहकारी बिल गेट्स यांच्यासह मायक्रोसॉफ्टची स्थापना केली होती. ॲलन यांची कंपनी 'व्हल्कन इंकने' याबाबत माहिती प्रसिद्ध केली आहे.

पुण्याच्या हवामान विभागाला शेतकऱ्यांनीं ठोकले ताळे

पुणे, ता. १७ : मान्सून बाबत चुकीची माहिती वर्तवली जात असल्याने शेतीचे नुकसान होत आहे, असा आरोप करून शेतकऱ्यांनीं हवामान विभागाच्या कार्यालयाला टाळे ठोकून ठिय्या आंदोलन केले. आंदोलनादरम्यान शेतकऱ्यांनीं निषेधार्थ घोषणा देवून संताप व्यक्त केला.

हवामान खाते हे बियाणे व विमा कंपनींशी संगनमत करून चुकीची माहिती देतात. शेतकरी हवामान खात्यावर विश्वास ठेवतो पण पावसाच्या अभावामुळे शेतीचे नुकसान होते परंतु याचा कंपनींच्या नफ्यावर काहीच परिणाम होत नाही असा आरोप या आंदोलनाचे अध्यक्ष गंगाभीषण थावरे यांनी केला. आंदोलनातील शेतकरी बीड जिल्ह्यातील होते. मराठवाड्यात सातत्याने दुष्काळ पडत आहे. अशा परिस्थितीत हवामान विभाग चुकीची माहिती देत असल्याने हे खाते बंद करावे जेणेकरुन शेतकऱ्यांचे नुकसान टळेल अशी प्रतिक्रिया शेतकऱ्यांनीं आंदोलनादरम्यान व्यक्त केली.

निर्यातीत घसरण, तूट १३.९८ अब्ज डॉलरवर

अर्थवेध

“ **निर्यातीत जरी घसरण झाली असली तरी पेट्रोलियम पदार्थ, रसायने, औषधे, कापसाचे धागे, फॅब्रिक प्लास्टिक आणि हातान बनवलेल्या वस्तूंची निर्यातीत वाढ झालेली दिसून आली. सप्टेंबरमध्ये व्यापारी तूट कमी झाली असली आणि आणखी कमी व्हावी, यासाठी सरकार प्रयत्नशील असले तरी ऑक्टोबरमध्ये व्यापारी तूट १७.५ बिलियन डॉलर झालेली असेल.**

-**आदिती नायर,** अर्थतज्ज्ञ(आयसीआरए)

मुंबई, ता. १७, (वृत्तसंस्था) : वाणिज्य मंत्रालयाने सादर केलेल्या आकडेवारीनुसार चालू आर्थिक वर्षात पहिल्यांदाच निर्यातीत घसरण झाली आहे. सप्टेंबरमधे निर्यातीत घट होऊन निर्यात २७.९५ बिलियन डॉलरवर थांबली. आयातीत १०.४५% वाढ होऊन आयात ४१.९ बिलियन डॉलरवर पोहोचली आहे.

आयातीमध्ये तुलनेने कमी वाढ झाल्याने व्यापारीतूट १३.९८ बिलियन डॉलर झाली असून ऑगस्ट महिन्यात १७.३९ बिलियन डॉलर होती. मागील सहा महिन्यांत निर्यातीत १२.५४% ने आणि आयातीत १६.१६% ने वाढ झाली आहे.

भारताची चालू वर्षातील व्यापारी तूट जीडीपीच्या २.८% आहे. मागील वर्षी हीच तूट जीडीपीच्या १.९% होती.

मुळा-मुठा नदी सुधार प्रकल्पाला मिळणार जागतिक बँकेचे कर्ज

पुणे, ता. १७ : मुळा-मुठा नदीचे वाढते प्रदूषण लक्षात घेऊन केंद्र शासनाच्या विशेष अनुदानाच्या सहाय्याने एक हजार कोटीचे कर्ज जागतिक बँककडून मंजूर झाले आहे. या कर्जाची परतफेड केंद्र शासन करणार असल्याची माहिती जिल्हा पायाभूत योजना सल्लागार समितीच्या बैठकीदरम्यान केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्री प्रकाश जावडेकर यांनी दिली.

एक हजार कोटीतील ५७ कोटीचे अनुदान मंजूर झाले असून, कामाची सुरुवात मार्चपासून होईल असे आश्वासनही जावडेकरांनी दिले. मुळा-मुठा नदी सुधार प्रकल्पाचे काम काही वर्षांनी रखडले आहे, अशा परिस्थितीत मिळालेले अनुदानित कर्ज हे कामाला गती देणार असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

हजारो आयुष्य जगण्याची संधी पुस्तकामुळे : अरुणा ढेरे

राहुल माने

पुणे, ता. १७ : आपल्याला हजारो व्यक्तींचे आयुष्य जगण्याची संधी पुस्तकामुळे मिळते असे मनोगत जेष्ठ लेखिका अरुण ढेरे यांनी व्यक्त कले. वाचन प्रेरणा दिनानिमित्त जयकर ग्रंथालय पुणे विद्यापीठान अयोजित केलेल्या 'लेखक आपल्या भेटीला' या कार्यक्रमात त्या बोलत होत्या त्या म्हणाल्या की, लहानपणी वडील रा.चिं.ढेरे, द. वा. पोतदार यांच्यामुळे पुस्तके वाचण्याची आवड निर्माण झाली वडिलांमुळे लहानपणीच साहित्यिकांचा सहवास लाभला यातून ग्रामसंस्कृती मौखिक वाङमय यांची ओळख झाली या समृद्ध वारशामुळे वयाच्या सातव्या वर्षी 'कळीच स्वप्न' हि कविता लिहिली आणि तेथूनच लेखनाचा प्रारंभ झाला.

ढेरे म्हणतात की, कविता ही भावनांच्या अभिव्यक्तीतुन तयार होते. त्यामुळे कवींनी शब्दांच्या प्रेमात पडायला पाहिजे. कवितेतील शब्द हे अनुभवांचा संचितातून नकळत येतात. जीवंत अनुभव कवितेतून मांडायचे असतात. चांगली कविता ही शब्दांपलीकडे असते। संतकवीयत्री अक्कम्मादेवी, बहिणाबाई, कान्होपात्रा, ललदेव यांनी तत्कालीन सामाजिक परिस्थिती कवितेतून मांडली.

सतत वाचन विचार यातून लिहण्याची सामग्री सापडते. मौखिक परंपरेतून आलेल्या गाण्यांमधून तत्कालीन स्त्रियांची परिस्थिती समजते. स्त्रियांवरील बंधने भोंडल्याच्या गाण्यातून समजतात. त्यामुळे भोंडल्याची गाणीही व्यक्त स्त्रीजीवनाचा दस्तावेज आहे. आज स्त्रियांनी सर्वच क्षेत्रात प्रगती केली असली तरी वास्तवातील स्त्रीची घुसमट तितकीच खरी आहे. हे अंतर कमी करण्याची गरज असून लेखनाच्या माध्यमातून मी ते मांडत असते. माणूस सृष्टीचा भाग म्हणून जगत होता निसर्ग विषयी आदर होता स्त्री व सृष्टी यांच्यावरील अत्याचाराची फळे आपण भोगत आहोत, असेही ढेरे यांनी सांगितले.

स्वागत व प्रास्ताविक जयकर ग्रंथालयाच्या संचालिका डॉ अपर्णा राजेंद्र यांनी केले तर आभार डॉ सुषमा खिलारे यांनी मांडले.

जयकर ग्रंथालय पुणे विद्यापीठ येथे वाचन प्रेरणा दिनानिमित्त लेखक आपल्या भेटीला या कार्यक्रमादरम्यान जेष्ठ साहित्यिका अरुणा ढेरे, डॉ. अपर्णा राजेंद्र व इतर.

जाती तोडण्यासाठी आंतरजातीय विवाहाला पर्याय नाही

''ऑनर किलिंग'' सारख्या घटना समाजात नेहमी घडत असताना आंतरजातीय किंवा आंतरधर्मीय विवाह करू इच्छिणाऱ्या मुला-मुलींच्या पाठीशी उभे राहून त्यांचा संसार थाटण्याच्या कामात प्रा.विलास वाघ सक्रिय आहेत. त्यांच्या परिवर्तन मिश्रविवाह संस्थेच्या मार्फत त्यांनी अनेक आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाह घडवून आणले आहेत. तसेच अनाथ व शोषित मुलांच्या शिक्षणासाठी वसतिगृह स्थापन करून त्यांना शिकवण्याचे काम ते करत आहेत. पुणे विद्यापीठातील प्राध्यापकाची नोकरी सोडून समाजकार्याला वाहून घेणाऱ्या प्रा. वाघ यांच्याशी केलेला संवाद ...

प्रा. विलास वाघ

मुलाखत

कार्तिक पुजारी, बालाजी आघाव

प्रश्न : जाती-धर्माची मुळे घट्ट होत असताना आंतरजातीय आणि आंतरधर्मीय विवाहाच्या संकल्पनेकडे तुम्ही कोणत्या दृष्टीने पाहता?

उत्तर : जाती-धर्माची प्रस्थापित मोठी बुरुजे पाडायची असतील तर आंतरजातीय आणि आंतरधर्मीय विवाहांना पर्याय नाही. परिवर्तन मिश्रविवाह संस्थेच्या मार्फत आम्ही हेच कार्य करत आहोत. आतापर्यंत आम्ही अनेक आंतरजातीय विवाह करून देण्यात पुढाकार घेतला आहे. विशेष म्हणजे दिवसेंदिवस आंतरजातीय आणि आंतरधर्मीय विवाहांचे प्रमाण वाढत आहे. प्रस्थापित व्यवस्थेला धक्का लावायचा म्हणजे विरोध तर होणारच; पण जर समाजात बदल घडवायचा असेल तर या गोष्टी सहन कराव्या लागतात.

प्र. : आंतरजातीय विवाह करणाऱ्या मुला-मुलींना कोणकोणत्या अडचणींना सामोरे जावे लागते?

उ. : सुरुवातीला त्यांच्या विवाहाला घरच्यांकडून विरोध असतो. आपल्या मुलाने किंवा मुलीने दूसऱ्या जातीत लग्न करावे, हा विचारच त्यांना सहन होत नाही. यातून खोट्या प्रतिष्ठेपायी हत्या केल्याच्या घटनाही घडल्या आहेत. समाज आपल्याला वाळीत टाकेल, बेअब्रू होईल या भावनेने पालक तीव्र विरोध करतात. पण जेव्हा एकदा लग्न होते तेव्हा बऱ्याच पालकांचा विरोध मावळत असल्याचा अनुभव आलेला आहे.

प्र. : आतापर्यंत तुमच्या संस्थेमार्फत किती विवाह पार पाडले आहेत?

उ. : प्रत्येक महिन्यात आमच्या संस्थेचा मेळावा भरवण्यात येतो. त्यात हमखास एक ते दोन विवाह घडवून आणले जातात. त्यामुळे आतापर्यंत आम्ही अनेक आंतरजातीय विवाह लावले आहेत. विशेष म्हणजे सर्व विवाह यशस्वी आहेत. आंतरजातीय विवाह केल्यामुळे त्यांना समाजाविरुद्ध लढण्यासाठी उपजत शक्ती निर्माण होते. आंतरजातीय विवाह केलेल्या जोडप्यांमध्ये खुप कमी भांडणे होतात. याउलट तडजोडीचाच विचार असतो. लक्षात घेण्यासारखी गोष्ट म्हणजे आंतरजातीय विवाह करणाऱ्या जोडप्यांचा उद्देश फक्त जातप्रथा मोडणे हा नसतो, तर एकमेकांबद्दलच्या प्रेमामुळे ते विवाह करतात.

प्र. : पुणे विद्यापीठातील प्रतिष्ठित नोकरी सोडून सामाजिक क्षेत्राला वाहून घेण्याचा प्रवास कसा होता?

उ. : डॉक्टर बाबासाहेबांच्या चळवळीत काम करत असतानाच सामाजिक कार्य करण्याची प्रेरणा मिळत गेली. समाजात इतके दु:ख भरले असताना आपण शांत बसावे हे शक्य नव्हते. दलित, शोषित वर्गासाठी काम करण्यातूनच पुढे जाण्याची प्रेरणा मिळत गेली. अनाथ मुले, भटक्या जाती, मागासवर्गीय मुलांसाठी धुळे व तळेगाव ढमढेरे येथे उभारलेल्या वसतिगृहाच्या माध्यमातून अनेक विद्यार्थ्यांना शिक्षण घेणे शक्य झाले आहे.

प्र. : वयाची ८० वर्षे पूर्ण करत असताना अजूनही काम करावं असं वाटतं का ?

उ. : अजून सुदृढ आयुष्य मिळाले असते तर अजून काम करत राहिलो असतो. पण शरीर साथ देत नसल्याने आता हे थांबावावे लागणार आहे. पण संस्थेमार्फत हे काम निरंतर चालूच राहील.

मराठमोळ्या प्रा. अष्टेकरांना आइन्स्टाइन पुरस्कार जाहीर

पुणे, ता. १७ : गुरुत्वाकर्षण विज्ञानात चार दशकांपासून कार्यरत भारतीय वंशाचे अमेरिकन शास्त्रज्ञ प्रा. अभय अष्टेकर यांना प्रतिष्ठेचा आइन्स्टाइन पुरस्कार जाहीर झाला आहे. अमेरिकन फिजिकल सोसायटीने ही घोषणा केली आहे.

अमेरिकन फिजिकल सोसायटीद्वारे अष्टेकर यांना १० हजार डॉलर पुरस्कार स्वरूपात देण्यात येणार आहत. महान शास्त्रज्ञ अल्बर्ट आइन्स्टाइन यांच्या नावाने देण्यात येणाऱ्या या पुरस्काराची सुरुवात १९९९ मध्ये झाली होती.

पेनसिल्व्हानिया स्टेट यूनिवर्सिटीच्या 'इन्स्टिट्यूट फॉर ग्रॅव्हिटेशन अँड द कॉसमॉस'चे निर्देशक असलेल्या अभय अष्टेकर यांना हा पुरस्कार सामान्य सापेक्षता, ब्लॅक होल सिद्धांत आणि क्वांटम फिजिक्समधील योगदानाबद्दल देण्यात येत आहे.

अष्टेकर यांचा जन्म ५ जुलै १९४९ मध्ये कोल्हापूर जिल्ह्यात झाला. त्यांचे बालपण आणि शिक्षण मुंबईत झाले. पुढे गुरुत्वाकर्षण विषयातील पदवी त्यांनी टेक्सास विद्यापीठातून प्राप्त केली. त्यांनी अनेक नामांकित विद्यापीठात अध्यापनाचे काम केले आहे. अष्टेकर यांनी १९७४ मध्ये शिकागो विद्यापीठातून पीएच.डी प्राप्त केली. त्यांनी फ्रान्स, कॅनडा आणि भारतात महत्वाच्या पदावर काम केले आहे. त्यांच्या मते, भौतिक आणि खगोल क्षेत्रात होणाऱ्या शोधांमध्ये अनेक दशकांपर्यंत गुरुत्वाकर्षणाचे प्रभुत्व राहील. भौतिकशास्त्र क्षेत्रात भारतीय वैज्ञानिकांचे काम चांगले असून ते चीनपेक्षाही पुढे असल्याचेही ते म्हणाले.

वेधसंवाद

वृत्तवेध

बुधवार, १७ ऑक्टोबर २०१८, पान २



फेसबुकची तीन कोटी अकौंट हॅक

फेसबुकच्चमधील दोन कोटी नव्वद लाख यूजर्सच्या अकौंटमधील वैयक्तिक माहिती हॅकर्सने मिळविली असल्याचे फेसबुकच्चने आज स्पष्ट केले. गेल्या महिन्यात हॅकिंगबाबतची घटना उघड झाल्यानंतर जगभरातून चिंता व्यक्त झाली होती. आज फेसबुकच्चच्या उत्पादन व्यवस्थापन विभागाचे उपाध्यक्ष गाय रोझेन यांनी एका पोस्टद्वारे स्पष्टीकरण दिले.

संपादकीय

व्यक्तीस्वातंत्र्याचा जागर

गेल्या वर्षी ऑगस्ट महिन्यात सर्वोच्च न्यायालयाने दोन क्रांतिकारी निर्णय दिले. पहिला-'तिहेरी तलाक' असंवैधानिक असल्याचा निर्वाळा व दुसरा-'खासगीपणाचा अधिकार' हा मुलभूत असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले. हे दोन्ही निर्णय भारतीय न्यायव्यवस्थेवर दुरगामी परिणाम करणारे ठरले आहेत. असे यासाठी म्हणायचे की, मागच्या महिन्यात न्यायालयाने समलैंगिक संबधांना मान्याता देणाचा निर्णय देताना, आधारची वैधता व शबरीमला प्रकरणात निर्णय देत आसताना तोच पाया मानला जो गेल्या वर्षीच्या प्रकरणात मानला होता. तो पाया म्हणजे माणसाचे मुलभूत व्यक्तीस्वातंत्र्य!

भारतीय संविधानात माणसाचे मुलभुत अधिकार अंतर्भुत आहेत. यात समजुन घेण्याची गोष्ट अशी आहे की, हे मुलभुत अधिकार प्रत्येक व्यक्तीला लागु होतात. एखाद्या समुहाला किंवा संघटनेला नाही. अर्थात समुहाला किंवा संस्थेला मुलभुत अधिकार असतातच पण ज्यावेळी एखाद्या संघटनेचे किंवा समुहाचे मुलभुत अधिकारां विरूद्ध एखाद्या व्यक्तीचे मुलभुत अधिकार असा पेच निर्माण होतो त्यावेळी न्यायालय त्या एका व्यक्तीच्या मुलभुत अधिकाराला सर्वोच्य मानते. कारण संविधानात मुलभुत अधिकाराची व्याख्या मांडताना एका व्यक्तीला मुलभुत घटक मानले आहे. उदाहरणादाखल येथे शबरीमाला मंदिरात महिलांना प्रवेश प्रवेश देण्यात यावा असा निर्णय देताना महिलांच्या समानतेचा मुलभुत हक्क, धर्मपालन करण्याचे व्यक्तीस्वातंत्र्य यांचा पुरस्कार न्यायालयाने केला आहे. याप्रकरणात मंदिर प्रशासनाला त्यांचा अंतर्गत व्यवहार करण्याचा मुलभुत अधिकार आहे, पण तो अधिकार एका व्यक्तीच्या मुलभुत अधिकाराची गळचेपी करत असेल तर तो आपोआपच कालबाह्य होत असतो. महिलांनाही तेवढेच अधिकार आहेत जेवढे एखाद्या पुरुषाला आहेत.

मुस्लिम समाजाला त्यांचे धार्मिक तसेच वैवाहिक परंपरा पाळण्याचे खास स्वातंत्र्य भारतीय राज्य घटनेने दिलेले आहे. पण त्याच वेळेला ती धार्मिक परंपरा मुस्लिम महिलांचे शोषण करणारी असल्यास त्या परंपरेला रद्दबादल करण्याची शक्ती आपल्या न्यायव्यवसस्थेत आहे. महिलांना समान वागणुक मिळावी तसेच तीच्या वैयक्तिक हक्काचे संरक्षण व्हावे यासाठी आपली न्यायव्यवस्था अधिक जागरुक आहे. खासगीपणाचा अधिकार हा मुलभुत अधिकार असल्याचे स्पष्ट करताना न्यायालयाने व्यक्तीस्वातंत्र्य हे केंद्रस्थानी ठेवलेले दिसुन आले.

देश कसा निर्माण होतो? एक-एक व्यक्ती एकत्र मिळूनच देश निर्माण होतो. एक व्यक्ती हेच न्याय देण्याचे एकक असल्याचे स्पष्टच आहे. एक व्यक्ती त्याच्या खाजगी जीवनात काय करते, काय खाते, काय पाहते, कसे कपडे घालते, काय चर्चा करते, कुणाची पुजा करते.. अश्या अनेक चारभिंतीआड घडणार्या गोष्टीमध्ये सरकार किंवा इतर कोणीही ढवळाढवळ करु शकत नाही. अर्थात सार्वजनिक जीवनात त्याला नियम पाळावेच लागतात. हे निर्णय देत असतानाच न्यायालयाने भविष्यातील अनेक प्रकरणासाठी एक आदर्श वैचारिक पाया तयार केला आहे.

भारताच्या ब्रिटिशकालीन आणि कालबाह्य झालेल्या कायद्यानुसार सम लैंगिक संबध हा गुन्हा होता. समलैंगिक संबंध हे अनैसर्गिक मानले जात होते. खरचं हे संबध अनैसर्गिक असतात का? निसर्गाने निर्माण केलेली केणतीच गोष्ट अनैसर्गिक नसते. समलैंगिक आकर्षण असणे ही नैसगिक भावना आहे. त्याचा आपण आदर केला पाहिजे. या जुनाट कायद्यामुळे हजारो समलैंगिक लोकांची मुस्कटदाबी होत असे. त्यांच्या मुलभुत अधिकारांचे काय? राज्यघटनेने दिलेला समानतेचा अधिकार त्यांना सुदधा आहेच की. व्यक्तीस्वातंत्र्य तसेच अन्यायाविरोधात आवाज उठवण्याचा सुदधा त्यांना अधिकार आहे. फक्त बहुसंख्यांकाच्या मतानुसार जर संस्कृती किंवा परंपरा चालत असतील तर ती खरी लोकशाही कशी? हा निर्णय देताना सर्वोच्य न्यायालयाने स्पष्ट शब्दात सांगितले आहे की, बहुसंख्यांकांचे मत हे अल्पसंख्यांकांवर लादता येऊ शकत नाही. तीच बाब 'आधार' च्या बाबतीत आहे. सर्व भारतीय नागरीक एकाच छत्राखाली यावेत तसेच सरकारी योजंनामध्ये भ्रष्टाचाराला वेसण घालुन गरजु व्यक्तीपर्यंत त्या योजनांचा लाभ पोहचावा आसा आधारचा प्राथमिक उद्देश होता. पण हे आधार कार्ड आपली सर्वच प्रकारची माहिती जमा करुन घेते जी खुपच खाजगी आणि संवेदनशील असते.

या आधारचा वापर ज्यावेळी खाजगी कंपन्या करतील तेंव्हा त्यातील माहिती सुरक्षित राहिलच असा आश्वासन कोणीच देऊ शकत नाही. आपल्या देशात अजुन माहितीच्या सुरक्षिततेसाठी कायदा आलेला नाही. असे असतानाही तुर्त तरी न्यायालयाने 'आधार' ला आधार दिलेला आहे. पण आपली खाजगी माहिती आता सुरक्षित राहिलेली नाही. आता आपण अधिक स्वातंत्र्याकडे वाटचाल करत आहोत. न्यायालयाचे मागच्या काही क्रांतीकारी निर्णायांमुळे खर्या अर्थाने प्रगतशील आणि पुरोगामी देशांच्या पंक्तीत जाऊन बसलो आहोत. पल्ला अजुन बराच गाठायचा आहे. पण हा व्यक्तीस्वातंत्र्याचा जागर असाच चालु राहायला हवा.

मराठवाडा की दुष्काळवाडा

आढावा
- कार्तिक पुजारी

'असेच हे कसेबसे कसेतरी जगायचे'.. या सुरेश भट्ट यांच्या कवितेतील पंक्ती प्रमाणे आज मराठवाड्यातील नागरिक जीवन जगत आहेत. गेल्या पाच वर्षांपासून मराठवाड्याला सतत कमी पावसाला सामोरे जावे लागत आहे. जर हे दुष्टचक्र असेच चालू राहिले आणि त्यावर जर मुलभूत असा काही उपाय केला गेला नाही तर मराठवाड्यातील नागरिकांचे जगणे अधिक खडतर होत जाईल.

मराठवाडा पर्जन्यछायेच्या प्रदेशात येत असल्याने नैऋत्य मौसमी वाऱ्यांनी आणलेला पाऊस कोकण आणि बराचसा पश्चिम महाराष्ट्र भागात पडून मोकळा होतो. मराठवाड्यात सरासरी ८८० मिलिमीटर पाऊस पडतो, त्यातही नियमितता नसते. महाराष्ट्रातील इतर विभागांपेक्षा मराठवाडा विभागात पावसाची सरासरी कमी आहे याचा मोठा फटका मराठवाड्यातील जनतेला बसत असून पंधरा दिवसातून एकदा पाण्याचा पुरवठा होत असल्याने लोकांचे हाल होत आहेत. घागरभर पाण्यासाठी येथील नागरिकांना मैलोंनमैल पायपीट करावी लागत आहे. भुजल पातळी खालावल्याने ही परीस्थिती अधीकच भीषण बनली आहे.

जिथे पिण्याचा पाण्याची वानवा आहे तिथे शेतीला पुरेसे पाणी मिळणे तसे दुरापास्तच. शेतीवर पोट असणाऱ्या शेतकऱ्यांची यातून अडचण होते. काढलेले कर्ज फेडता न आल्याने स्वतःचे सरण रचून आत्महत्या केल्याच्या घटना मराठवाड्यात घडल्या आहेत.

शाळेला जाण्यासाठी लागणारा एसटी पास काढण्यासाठी पैसे नसल्याने जन्मदरिद्री बापाच्या लेकीने आत्महत्या या ठिकाणी केली आहे. अश्या संवेदना हेलावणाऱ्या घटना घडून देखील ठोस असं काही झाले नाही ही शोकांतीका आहे.

राज्यातील उपयुक्त पाणीसाठ्याचा विचार करता राज्यभरात एकूण क्षमतेच्या ६५ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. मराठवाड्यात फक्त २७ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. गेल्या वर्षी याच काळात राज्यभरात ७४ टक्के, मराठवाड्यात ६५ टक्के उपयुक्त पाणीसाठा शिल्लक होता. राज्यांचा विचार करता एखाद्या विभागात पाणीसाठा कमी असल्यास तेथील नागरिकांच्या पाण्याची गरज भागवण्यासाठी इतर विभागातून ते दिले जाते. मराठवाड्यातील पाण्याचा साठा लक्षात घेता इतर विभागातील नागरिक मराठवाड्याच्या मदतीला येतील अशी आशा मराठवाड्यातील नागरिक बाळगून आहेत.

मराठवाड्यात प्रामुख्याने ऊस, कापूस, सोयाबीन व डाळ ही पिके घेतली जातात. ऊस या पिकासाठी मोठ्या प्रमाणात पाणी लागते आणि विरोधाभास म्हणजे पाणी उपलब्धता कमी असलेल्या मराठवाड्यात ऊस पीक मोठ्या प्रमाणात घेतले जाते. राजकारण्यांच्या मालकीचे असलेले साखर कारखाने आणि त्यांच्या हट्टापायी ही किमया निरंतर चालू आहे. दुष्काळाने होरपळलेल्या नागरीकांचा विचार करून जर शासनाने काही कडक पावले उचलली तर दुष्काळाची दाहकता नक्कीच कमी होईल.

पाण्याच्या प्रश्नावर राज्य सरकारने 'जलयुक्त शिवार' ही योजना काढली. काही ठिकाणी तिला उत्तम यश मिळालेही, परंतु संपूर्ण राज्याला त्याचा फायदा होण्यासाठी आधी भरपूर पाऊस तर पडला पाहीजे, नाहीतर काहीच उपयोग नाही. तो जोपर्यंत पडत नाही, तोपर्यंत हे हाल असेच चालू राहतील.

कृषी विभागाच्या माहितीनुसार मराठवाड्यातील ५०.३ लाख हेक्टर शेतीयोग्य जमीनीपैकी फक्त १०.५ लाख हेक्टर जमीन सिंचनाखाली आहे. ही आकडेबारी राष्ट्रीय पातळीवरच्या आकडेवारीपेक्षा अर्ध्याने कमी आहे. म्हणजेच सरकारला 'जलयुक्त शिवार' योजनेवर अधिक भर द्यावा लागणार आहे.

इस्राईल जर ४४८ मिलिमीटर पाऊसात आपली गरज भागवू शकतो तर मराठवाडा ८८० मिलिमीटर पावसात असं का करू शकत नाही? असा प्रश्न शासनाला नक्कीच पडायला हवा.

गरज पर्यावरणपूरक इंधनसाधनांच्या निर्मितीची

पर्यावरण
- योगेश सिंगल

जागतिक बाजारात कच्च्या तेलाच्या वाढत्या किंमती आणि डॉलरच्या तुलनेत रुपयाची होणारी घसरण ही अर्थव्यवस्थेतील वित्तीय तूट व चालू खात्यावरील तूट वाढविण्यास कारणीभूत ठरते आहे. याचा परिणाम आर्थिक वृध्दी मंद गतीने होईल. या संकटात अजून भर टाकणारी गोष्ट म्हणजे आयपीसीसी या संस्थेने एक अहवाल सादर केला आहे. ज्यामधे हवामान बदल आणि जागतिक तापमान वाढ याबद्दल चिंता व्यक्त केली आहे. या आर्थिक व पर्यावरण संकटांना सामोरे जाताना समतोल साधत भारताला आर्थिक-सामाजिक विकास करायचा असल्याने 'जैवइंधन' वापर आपली गरज आहे.

भारतीय अर्थव्यवस्था जगात वेगाने वृध्दी करणारी अर्थव्यवस्था आहे. आर्थिक वृध्दी, समता आणि चांगले मानवी जीवन हे विकासाचे उद्दिष्ट आहे. ऊर्जा हे सामाजिक-आर्थिक विकासाचे महत्वपूर्ण आदान आहे. देशाचे ऊर्जा धोरण हे ऊर्जा सुरक्षा, क्षमता आणि पर्यावरण पूरक असावे. 'जैवइंधन' हे अपांरपरिक ऊर्जा स्रोत आहे. स्वच्छ ऊर्जा, परवडणारा खर्च आणि मुबलक उपलब्धता ही त्याची गुणवैशिष्ट्ये आहे. आजही आपल्या एकुण मागणीच्या ९५% गरज ही पेट्रोल तेल-द्वारे भागविली जाते ज्यापैकी ८०% कच्चे तेल आयात करून होते. आयात तेलाचा खर्च हा लाखो कोटींचा आहे ज्याचा भार अर्थव्यवस्थेवर असल्याने शासनाची दमछाक होते. जैव इंधनाच्या वापरामुळे आयात खर्च वाचेल आणि स्वच्छ इंधन हे प्रदुषण रोखण्यासाठी उपयुक्त ठरेल.

यावर्षी सरकारने 'जैव इंधन' धोरण जाहीर केले आहे. जागतिक पातळीवर भारताने हवामान बदल रोखण्यासाठी बांधिलकी दाखवली आहे. त्याला प्रतिसाद म्हणून हे धोरण महत्त्वाचे ठरते. रस्त्यावर धावणाऱ्या वाहनांतून निघणारा धूर हा कार्बन उत्सर्जनाला कारणीभूत आहे. त्याला आळा घालण्यासाठी 'जैवइंधन' पूरक ठरेल. भारत स्टेज-६ धोरण पुर्णत्वास नेण्यासाठी जैव ईंधन वापर आवश्यक आहे. म्हणूनच हे धोरण अर्थव्यवस्था व पर्यावरणाला शाश्वत मार्गाने नेण्यासाठी मार्गदर्शक म्हणून आखले गेले आहे. जैव इंधन धोरणात तंत्रज्ञान विकास आणि शेती पिकांचा वापरावर भर देण्याची योजना आहे. अधिक शेती उत्पादन खरेदी करून बायो-इथेनॉल निर्माण करणार असल्याने, शेतकऱ्यांच्या हातात चार पैसे शिल्लक येतील. आज पेट्रोल व डिझेल वापरात इथेनॉल दहा टक्के वापरले जाते. त्यात वाढ करून २०% नेण्याचे धोरण आहे.

एकंदरीत परिस्थिती लक्षात घेऊन सरकारने प्रभावी कार्यक्रम आखून ठरविलेल्या धोरणाला तडीस नेले असता त्याचा परिणाम आपण शाश्वत विकासाकडे वाटचाल करण्यावर होणार आहे. अन्यथा हवामान बदलाचे परिणाम भोगायला तयार राहण्याशिवाय दुसरा पर्याय आपल्याकडे नाही. म्हणून जैव इंधनाचे महत्त्व लक्षात घेतले असले तरी धोरणांची अंमलबजावणी हे आव्हान म्हणून समोर आहे, त्याचा सामना सर्वांना करावा लागणार यामध्ये दुमत नाही!

अंधाधून : एक गूढ, उत्कंठावर्धक कथा

चित्रपट परीक्षण
- हृषीकेश महिंद्रकर

'अंध होने का प्रॉब्लम तो सबको पता है, फायदे मैं बताता हूं!' हा डायलॉग आहे आकाशचा (आयुष्मान खुराना),चित्रपटाच्या कथेच्या नायकाचा. आकाश हा एक दृष्टिहिन संगीतकार असतो आणि एक अतिवश क्लिष्ट असे संगीत पूर्ण करण्याच्या महत्त्वाकांक्षेने झपाटलेला असतो. पुण्यात राहणाऱ्या आणि आपल्या संगीताच्या दुनियेत रमलेल्या आकाशची एकदिवस अचानक सोफीशी(राधिका आपटे) गाठ पडते.

सोफी पुण्यातील फ्रान्सिस्को नावाच्या रेस्टॉरेंटच्या मालकाची मुलगी असते. सोफीच्या मदतीने आकाश फॉन्सिस्का हॉटेलात पियानो वाजवून ग्राहकांचे मनोरंजन करू लागता. हे करताना सोफीसोबत त्याची जवळीक वाढते. याच दरम्यान बॉलिवूडचा एके काळचा सुपरस्टार प्रमोद सिन्हा (अनिल धवन) त्याला भेटतो. आकाशचे गाणे ऐकून प्रमोद इतका प्रभावित होतो की, आपल्या लग्नाच्या वाढदिवसाच्या पार्टीत त्याला गाण्याची गळ घातलो. आकाश प्रमोद च्या घरी पोहोचतो. इथून पुढे चित्रपट जशी कलाटणी घेतो, तसेच आकाशचे आयुष्यही कलाटणी घेते. यातूनच साकार होतो उत्कंठावर्धक, शेवटपर्यंत कथेशी जोडून ठेवणारा अंधाधून! नजरेपलीकडे ही काही गोष्टी असतात, हे या चित्रपटातून रेखाटण्यात पूजा लाडा-सुरतीना यश आलं आहे. फ्रेंच शॉर्ट फिल्म 'द पियानो ट्यूनर' वर आधारित या २ तास ३० मिनिटे असलेल्या चित्रपटाची कथा इतकी वेडी-वाकडी, उलटी-सुलटी आणि वेगवान आहे की, नक्की काय घडते आणि कसे घडते, ते सांगणे ही कठीण व्हावे. पण इतके नक्की की, प्रत्येक दृश्यासोबत हा चित्रपट एक अनपेक्षित धक्का देतो. चित्रपटातील विचित्र वळणं सांभाळताना चित्रपटाचा ताल, सूर, लय आणि विनोदशैलीला जराही धक्का लागणार नाही, हे शिवधनुष्य दिग्दर्शक श्रीराम राघवन यांनी अगदी लिलया पेलले आहे. आयुष्मान खुराना, राधिका आपटे, तब्बू यांचा अभिनय दमदार आहे. अनिल धवन, जकीर हुसैन, मानव विज,छाया कदम अश्विनी कळसेकरने आपआपली भूमिका अतिशय निष्ठेने साकारली आहे. थिएटरमधून बाहेर पडल्यावर ही अमित त्रिवेदीच्या आवाजातील गाणी आणि चित्रपटाचे पार्श्वसंगीत सतत डोक्यात राहतात. एकंदरीत कथा, दिग्दर्शन, संकलन, अभिनय, संगीत आणि छायांकन या सर्वच बाबतीत हा चित्रपट उत्तम ठरतो.

अभिनेत्री रविना टंडनवर गुन्हा दाखल

मुझफ्फरनगर, ता. १७ (एएफपी) : अभिनेत्री रविना टंडन वर वाहतुकीस अडथळा निर्माण करण्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गेल्या आडवड्यात १२ ऑक्टोंबरला रविना टंडन ह्या मुझफरनगर येथील एका दुकानाच्या उद्घटनासाठी आलेली असताना तीच्या चाहत्यांनी प्रचंड गर्दी केल्याने काही काळ रस्त्यावरील वाहतुक विस्कळीत झाली होती. त्यामुळे तेथील एका वकिलांने स्थानिक न्यायालयात रविना टंडन आणि दुकानमालकावर वाहतुकीस अडथळा आणण्यास कारणीभुत ठरल्याबद्दल गुन्हा दाखल केला आहे.

महासत्तेची स्वप्ने पाहणारा भारत अद्याप भुकेलेलाच!

देशवेध

न्यूयॉर्क, ता. १७ (वृत्तसंस्था) : जागतिक भूक निर्देशांक २०१८ च्या अहवालानुसार भुकेची समस्या असणाऱ्या ११९ देशाच्या यादीत भारताचा १०३ क्रमांक आला आहे. या निर्देशांकांत भारताला ३१.१ गुण मिळाले. या यादीत चीन २५, नेपाळ ७२, म्यानमार ६८, श्रीलंका ८६, पाकिस्तान १०६ क्रमांकावर आहे. गर्भावस्थेत आईचे होणारे कुपोषण त्यामुळे जन्माला येणारी कमी वजनाची मुले, आहार योजनांचे अपयश यामुळे कुपोषणाची समस्या भारतातल्या प्रमुख राज्यात आजही तीव्र आहे.

जगभरातल्या विकसनशील देशातील भूकबळीच्या समस्येचा आढावा घेऊन इंटरनॅशनल फूड पॉलिसि रिसर्च इन्स्टिट्यूट हा अहवाल तयार करते. निर्देशांक ठरवण्यासाठी देशातील कुपोषित लोकसंख्येची टक्केवारी पाच वर्षाखालील मुलांची खुंटलेली वाढ पाच वर्षाखालील मुलांमधील मृत्यू दर हे घटक विचारात घेतले जातात.

समलैंगिकता आणि सामाजिक वास्तव

समाजवेध
- बापू साखरे

गेल्या सहा सप्टेंबर रोजी सर्वोच्च न्यायालयाने समलैंगिकतेचा ऐतिहासिक निकाल दिला. यामध्ये समलैंगिकता हा गुन्हा ठरणार, या भारतीय दंडसंहितेतील कलम ३७७ मधील समलैंगिक व्यक्ती संदर्भातील अन्यायकारक तरतुदी रद्द केल्या. या निर्णयाचे तृतीयपंथीय समाजाने स्वागत केले. कायद्याने समलैंगिकांना स्वातंत्र्य मिळाले असले तरी समाज यांना माणूस म्हणून चांगली वागणूक देईल का, असा प्रश्न उपस्थित होताना दिसतो आहे. यामागील कारणे ही तशी आहेत की किन्नर असो किंवा समलैंगिक - यांना दुजाभावाचा करण्यात आलेला आहे. या समुदायाला चाकोरीबद्ध करण्यात समाजच कारणीभूत असल्याचे दिसून येते. असे असले तरी न्यायालयाच्या या निर्णयाने या समुदायाला आता सार्वजनिक ठिकाणी वावरणे शक्य झाले आहे. पण आजही समाजातील काही महाभाग तृतीयपंथी यांची टिंगल टवाळी करताना आढळतात. समाज हा जसा इतरांशी एकरूप होतो तसा समलैंगिकांचे एकरूप होईल का? खरेतर न्यायालयाने ३७७ कलमाबाबत दिलेला निर्णय व्यक्तिस्वातंत्र्याचा पुरस्कार करणारा आहे केवळ समलैंगिक समूहाने या निर्णयाचे स्वागत न करता संपूर्ण समाजाने या निर्णयाचे स्वागत केले पाहिजे. एक सकारात्मक दृष्टिकोन ठेवून संपूर्ण समाजाने समलैंगिक व्यक्तींना कौटुंबिक व व्यक्तिगत पातळीवर आधार देण्यास पुढे आले पाहिजे. नाहीतर त्यांचे मनोबल वाढण्यास मर्यादा येतील नकारात्मक प्रवृत्ती वाढीस लागेल. जे एक सुदृढ समाजासाठी चांगले लक्षण नाही. आजचा भारतीय समाज मानवाची स्वतःची स्वतंत्र लैंगिक ओळख मान्य करायला सहजासहजी तयार होत नाही. तो स्त्री आणि पुरुष हे दोनच प्रकार समाजमान्य आहेत असेच म्हणतो. भारत पारतंत्र्यात असताना ब्रिटिशांनी हा कायदा आपल्यावर लादला, त्या ब्रिटिशांनी त्यांच्या देशात मात्र समलैंगिकांना व्यक्ती म्हणून स्वीकारले. पण त्यांनी आपल्यावर लादलेला हा कायदा रद्द करण्यासाठी आपल्याला मात्र दीडशे वर्षांपेक्षा जास्त काळ लोटावा लागला, हे आपल्या समाजाचे प्रतिगामी लक्षण मानायला पाहिजे. या कायद्याच्या विरोधात ची लढाई समलैंगिक आणि एकहाती लढवली बहुसंख्य समाज व राजकारणी त्यांना पाठिंबा सुद्धा देऊ शकले नाही ही खेदाची बाब म्हणावी लागेल. काही राजकीय पक्षांनी तर संस्कृतीच्या नावाखाली त्यांनाच विरोध केला सम लैंगिक व्यक्तींना मूल दत्तक घेण्याचा हक्क येथील व्यवस्थेने नाकारला आहे.

समलैंगिक व्यक्तींना समाजाच्या मुख्य प्रवाहातून बाहेर काढून वेगवेगळ्या प्रकारे कलंकीत केले जात आहे. भारतीय समाजाला या मागासलेल्या मानसिकतेतून बाहेर काढण्यासाठी लैंगिकता आणि लिंग भेद याचे खरेखुरे शिक्षण देण्याची गरज आहे. त्यामुळे या समाजावर असणारा कलंक आणि त्यांच्या बाबत केला जाणारा भेदभाव कमी होईल या बरोबरच राजकीय व्यवस्थेने कायद्याची योग्य जोड दिली तर समलैंगिक व्यक्तींना समाजाच्या मुख्य प्रवाहात सामील होणे सहज शक्य होईल समलैंगिक व्यक्तींना समाजात सन्मानपूर्वक सहभाग वाढवणारी धोरणे शासनाने आखली पाहिजेत. भारतीय राज्यघटनेला अपेक्षित असलेली समता प्रत्यक्षात आणण्यासाठी आपल्या सर्वांची तयारी व राजकीय इच्छाशक्तीची गरज आहे.

हॉकीतील सुवर्ण अपेक्षांना पुन्हा मलेशियाचा हादरा

क्रीडावेध

मुंबई, ता. १७ (पीटीआय) : सुमारे एका महिन्यापूर्वी मलेशियाच्या वरिष्ठ हॉकी संघाने आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतीय पुरुष हॉकी संघाचे स्वप्न धुळीस मिळवले होते. आता युवा ऑलिंपिकच्या हॉकी फाइव्हमध्येही भारतीय युवकांना सुवर्ण लक्ष्यापासून मलेशियाविरुद्धच्या पराभवाने दुरावले.

अर्जेंटिनामध्ये सुरू असलेल्या या स्पर्धेत भारतास हॉकीच्या अंतिम सामन्यात दुहेरी अपयशास सामोरे जावे लागले. भारतीय मुलींच्या संघास यजमान अर्जेंटिनाविरुद्ध १-३ असा पराभव पत्करावा लागला. त्यापूर्वी मुलांच्या संघाने निर्णायक लढतीत मलेशियाविरुद्ध २-४ अशी हार पत्करली होती. त्यामुळे भारताच्या दोन्ही संघांना रौप्यपदकावरच समाधान मानावे लागले. मुलांच्या अंतिम लढतीत कर्णधार विवेक सागर प्रसादने दुसऱ्या मिनिटास भारताचे खाते उघडले. मात्र दोन मिनिटांत मलेशियाने बरोबरी साधली, मात्र पाचव्या मिनिटास प्रसादनेच भारताचा गोल केला आणि हीच २-१ आघाडी भारताने विश्रांतीपर्यंत कायम ठेवली. उत्तरार्धात चित्र बदलले. मलेशिया जास्त आक्रमक झाले. त्यांनी चार मिनिटांत दोन गोल करून आघाडी घेतली. त्या वेळीही चार मिनिटे शिल्लक होती. दोन मिनिटे असताना मलेशियाने गोल करीत विजय निश्चिच त केला.

अस्मितेच्या भूमिका साकारणारी स्मिता

व्यक्तीवेध
- संजय गुजर

१७ ऑक्टोंबर हा प्रसिद्ध अभिनेत्री स्मिता पाटील यांचा जन्म दिन. गेल्या पंधरा वर्षाच्या कारकिर्दीत एकावर एक सरस व्यक्तिरेखा साकारणाऱ्या स्मिताची नेहमीच आठवण येईल. एक प्रचंड ताकदीची अभिनेत्री, अवघ्या ३१ वर्षाच्या जीवनात अनेक पुरस्कार मिळवून अर्ध्यातच या जगाचा निरोप घेऊन सर्वांच्या मनात राहिलेली ही मराठमोळी अभिनेत्री. स्मिता पाटील यांनी आपल्या सशक्त अभिनयाच्या जोरावर समांतर तसेच व्यावसायिक सिनेमातही यश संपादन केले. दोन राष्ट्रीय पुरस्कार विजेत्या या अभिनेत्रीला भारतीय सिनेमातील अमूल्य योगदानासाठी पद्मश्रीने सम्मानित करण्यात आले आहे.

आखीव रेखीव चेहरा, मनोहारी डोळे, बोलण्यातून जाणवणारा आत्मविश्वास, प्रत्येक भूमिकेला न्याय देण्याची तयारी यामुळे ती एक सर्वश्रेष्ठ अभिनेत्री होती. स्मिता पाटील यांनी कारकिर्दीच्या सुरुवातीला मुंबई दूरदर्शन वर वृत्तनिवेदिका म्हणून काम केले. त्यानंतर श्याम बेनेगल यांच्या 'भूमिका' या चित्रपटात काम केले त्यानंतर स्मिता पाटील यांनी मागे वळून पाहिले नाही. चित्रपटाशिवाय अनेक महिला विषयक कार्य करणाऱ्या संस्थेशी ती जोडलेली होती.

दलित, शोषित स्त्रियांच्या, आंतरिक बळ असलेल्या प्रतिमा परिणामकारकतेने साकार केल्या. आपल्या कमाईचा मोठा हिस्सा तिने या कामासाठी खर्च केला. मराठीतील 'उंबरठा' चित्रपटातील सुलभा महाजन म्हणजे जणू काही आपल्या मनातली एक भावना आहे, असे त्याकाळी अनेक महिलांना वाटलं. १९७७ मध्ये तिला भूमिका या चित्रपटासाठी राष्ट्रीय पुरस्कार मिळाला होता,त्यानंतर 'जैत रे जैत'या मराठी चित्रपटासाठी १९७८ साली राष्ट्रीय पुरस्कार मिळाला. 'चक्र' या सिनेमातल्या अम्माच्या भूमिकेसाठीही तिने १९८० साली राष्ट्रीय पुरस्कार मिळवला होता. १५ वर्षाच्या कारकिर्दीत त्यांनी ७५ चित्रपटांमध्ये भूमिका केल्या. त्यातही वैविध्य होते.

मराठी-हिंदीसह कलात्मक व व्यावसायिक चित्रपटांमध्येही त्यांनी तितक्याच सामर्थ्याने भूमिका केल्या. हिंदीमध्ये आपली कारकीर्द सर्वोच्च पदावर असतानाच मराठी चित्रपटांविषयी विशेष आस्था बाळगली. अशा या चतुरस्त्र अभिनेत्री चा मृत्यू एकतिसाव्या वर्षी व्हावा ही अनेकांच्या मनात सलणारी गोष्ट आहे.



स्मिता पाटील यांचे प्रमुख चित्रपट : जैत रे जैत, भूमिका, उंबरठा, चक्र, बाजार, आज की आवाज, अर्थ, मंडी, आक्रोश, नमक हलाल, अर्धसत्य, निशांत, सामना, सर्वसाक्षी, गमन, शक्ती.

चीनचा अमेरिकी निवडणुकीत हस्तक्षेप

अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचा आरोप, चीनकडून इन्कार

विदेशवेध

वॉशिंग्टन, ता. १७ (पीटीआय) : रशियाप्रमाणेच चीननेही २०१६ च्या अमेरिकी अध्यक्षीय निवडणुकीत हस्तक्षेप केल्याचा आरोप अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी प्रथमच केला आहे.

गेल्या महिन्यात संयुक्त राष्ट्र सुरक्षा मंडळाच्या बैठकीत अध्यक्षपदावरून बोलताना ट्रम्प यांनी न्यूयॉर्क येथे असा आरोप केला होता की, अमेरिकेत २०१८ मध्ये होणाऱ्या मध्य मुदतीच्या निवडणुकातही त्यांचा हस्तक्षेपाचा डाव आहे. चीनने मात्र हे आरोप फेटाळले होते.

ट्रम्प यांनी रविवारी सीबीएस न्यूजच्या ६० मिनिट्स या कार्यक्रमात प्रथमच चीनवर २०१६ च्या अध्यक्षीय निवडणुकीत हस्तक्षेप केल्याचा आरोप केला असून ते म्हणाले की, रशियाने अध्यक्षीय निवडणुकीत हस्तक्षेप केला पण चीननेही तो केला आहे.



चीन ही मोठी डोकेदुखी झाली आहे त्यांनीही येथील निवडणुकीत हस्तक्षेप केला. रशियाच्या हस्तक्षेपावरील लक्ष उडवण्यासाठी चीनवर आरोप केल्याचा त्यांनी इन्कार केला. ङ्गरशियाने हस्तक्षेप केलाच पण मी तर म्हणतो चीननेही तो केलाङ्घ, असे त्यांनी सांगितले. अध्यक्षीय निवडणुकीत रशियाने हस्तक्षेप केल्याच्या प्रकरणातील चौकशीवरून अध्यक्ष ट्रम्प व महाधिवक्ता जेफ सेशन्स यांच्यात मतभेद झाले होते, सेशन्स यांनी या चौकशीतून माघार घेतल्याबाबत ट्रम्प यांनी नाराजी व्यक्त केली होती. या प्रकरणातील चौकशी बंद पाडण्याचा हेतू नसल्याचे सांगून ते म्हणाले की, मी शपथेवर काही सांगत नसतो पण चौकशी बंद करण्याचा कुठलाही हेतू नाही, ही चौकशी अन्याय्य आहे कारण असे रशियाशी कुठलेच साटेलोटे नव्हते. सध्या रॉबर्ट म्युलर हे या प्रकरणाची चौकशी करीत असून ३२ जण दोषी ठरले आहेत किंवा त्यांनी कबुली दिली आहे. निवडणुकीत मदतीसाठी रशियाला आवाहन केले हा आरोप फेटाळताना त्यांनी सांगितले की, मी मदतीसाठी रशियाकडे याचना केली असे तुम्हाला तरी खरोखर वाटते का, रशियानेसुद्धा हे आरोप हास्यास्पद ठरवले आहेत.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संज्ञापन व वृत्तपत्रविद्या विभागाच्या विद्यार्थ्यांचे प्रायोगिक प्रकाशन. * प्रकाशक : डॉ. उज्ज्वला बर्वे (विभागप्रमुख) * विद्यार्थी संपादक : कार्तिक पुजारी, योगेश सिंघल, बालाजी आघाव, राहुल माने, संजय गुजर, हृषीकेश महिंद्रकर, बापू साखरे